# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३००/२०२२ दिनांक : ०५/१०/२०२२

## मसाज सेंटरवर कारवाई करुन दोन पुरुष वेश्यादलाल यांना अटक करून अल्पवयीन पिडीत मुलीसह इतर दोन महिलांची सुटका-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांची कारवाई.

नालासोपारा पोलीस ठाण्याचे हद्दीत अशाईन युनिसेक्स सलून ॲण्ड स्पा, नालासोपारा पश्चिम ता. वसई जि. पालघर येथे दोन पुरुष वेश्यादलाल वेश्यागमनाकरीता मुली पुरवीत असल्याची अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा यांना गोपनीय माहिती मिळाल्यावरुन पोलीस निरीक्षक श्री संतोष चौधरी यांनी सदरची माहिती सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा यांना दिली. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष चौधरी, पोउपनिरी/प्रकाश विक्रम निकम, पोहवा बापु महारू, पद्मने, मपोहवा साक्षी डोइफोडे, महेंद्र पुंडलिक शेटये, रोशन नारायण किणी, मपोशि/जगदाळे चालक पोहवा/०७०६६ सुनिल विष्णु पागी सर्व नेम. अनै.मा.वा. प्र.कक्ष नालासोपारा तसेच बोगस गिहाईक व दोन पंचासह अशाईन युनिसेक्स सलोन ॲण्ड स्पा सेंटरवर जावुन छापा टाकला. त्यामध्ये दोन पुरुष दलाल नामे १) फिरोज शराफत अन्सारी वय ३१ वर्षे रा.रुम नं.०८ नारायण स्मृती अपार्टमेंट नालेश्वर नगर,ओसवाल नगरी नालासोपारा पुर्व व २) मोहम्मद वसीम निजामुद्दीन शेख वय २२ वर्षे रा. अशाईन स्पा ॲण्ड सलुन छेडा नगर यास ताब्यात घेतले तसेच एक अल्पवयीन पिडीत मुलगी वय १४ वर्षे ९ महीने व दोन पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायापासून सुटका केली आहे.

सदरबाबत नालासोपारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.४४१/२०२२ भादंविस कलम ३६६(ए), ३७०(१), ३७२, ३४, अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ सह बाल लैगिक अत्याचार प्रतिबंध कायदा कलम १७, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), अती. कार्य. पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/संतोष चौधरी व स्टाफ यांनी केली आहे.